MHBI170002722018

**नियमीत दरखास्त क्र.२/२०१८ मधील**
**निशाणी क्र.१५ वर आदेश**

दिनकर वि. महादेव

(दिनांक १५/०१/२०२६)

१. प्रस्तुत अर्ज अर्जदार नामे अशोक महादेव आंधळे या त्रयस्थ व्यक्तीने त्यांना प्रस्तुत दरखास्तीमध्ये समाविष्ठ करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन करण्यात आलेले आहे की, मौजे साळिंबा येथील गट क्र.११५ क्षेत्रफळ ०० हे ४० आर ही जमीन त्यांनी दि.२२.०५.२००७ रोजी खरेदीखत क्र.२२८४/२००७ अन्वये खरेदी केलेली असून त्याच फेरफार क्र.१३८५ दि.३०.०१.२००८ नुसार मंजूर झालेला आहे. सदर खरेदी दिनांकापासून अर्जदार हे सदर जमीनीचे मालक व ताबेदार आहेत.

२. अर्जदार यांचे वडील महादेव सुखदेव आंधळे (ऋणको) आणि लाला निवृत्ती आंधळे यांच्या विरुद्ध धनको नामे दिनकर यादवराव आंधळे यांनी मौजे साळिंबा येथील गट क्र.१७७ या मिळकतीवरील अतिक्रमण हटवुन ताबा मिळणेबाबत नि.दि.दा. क्र.७९/१९९९ दाखल केला होता. सदर दावा दि.२८.०७.२००६ रोजी मंजूर करण्यात आलेला असून ऋणको यांच्याकडुन ७ आर जमीनीचा ताबा देण्याचा आदेश पारित झालेला आहे, परंतु प्रत्यक्षात ऋणको महादेव सुखदेव आंधळे यांच्या मालकी व ताब्यामध्ये कोणत्याही प्रकारची जमीन अस्तित्वात नाही.

३. प्रस्तुत अर्जदार हे ऋणको महादेव सुखदेव आंधळे यांचा मुलगा असून दाव्याचा निकाल लागल्यानंतर गट क्र.११५ मधील ०० हे ४० आर ही जमीन त्यांनी खरेदी केलेली आहे. अर्जदाराचे वडील म्हणजेच प्रस्तुत दरखास्तीतील ऋणको महादेव आंधळे यांना फार पुर्वी पासून मुळ दावा दाखल करते वेळी गट क्र.१७७ यामध्ये किंवा त्या गटाच्या शेजारी कोणतीही जमीन अस्तित्वात नसतांनाही चुकीचा दावा दाखल केलेला होता. दाव्यामध्ये दाखविण्यात आलेली मोजणी चुकीची करण्यात आलेली असल्यामुळे तो मोजणी नकाशा चुकीचा आहे.

४. एकतर्फा आदेशाचा बेकायदेशीर फायदा घेण्यासाठी धनकोने प्रस्तुत दरखास्त दाखल केलेली आहे. अर्जदारास प्रस्तुत दरखास्तीमध्ये समाविष्ठ न केल्यास अर्जदार यांच्यावर अन्याय होईल. सबब, अर्जदार यांना प्रस्तुत दरखास्तीमध्ये समाविष्ठ करुन घेण्यात यावे अशी विनंती करण्यात आलेली आहे.

५.	धनको दिनकर यादवराव आंधळे यांनी त्याच अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे सादर करुन असे कथन केले आहे की, मुळ दाव्याचा निकाल दि.२८.०७.२००६ रोजी लागलेला असून दावा प्रलंबित असतना सदर गटातील मिळकतीची मालकी ऋणको यांच्याकडे होती. अर्जदार यांचे दि.२२.०५.२००७ रोजीचे खरेदीखत क्र.२२८४/२००७ हे पुर्णतः बेकायदेशीर आहे. मुळ दाव्याचा निकाल लागल्यानंतर ऋणको / प्रतिवादी यांनी त्या दाव्यावर कोणतेही अपील दाखल केलेले नसल्यामुळे मुळ दाव्याचा हुकुमनामा अद्याप कायम आहे. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती धनको यांनी केलेली आहे.

६.	अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला, दोन्ही पक्षकारातर्फे दि.०६.११.२०२५ रोजी युक्तीवाद ऐकण्यात आलेला आहे.

७.	प्रस्तुत दरखास्त ही नि.दि.दा क्र.७९/१९९९ मधील हुकुमनाम्याची अंमलबजावणी करण्याकरीता दाखल करण्यात आलेली असून मुळ दाव्याचा निकाल झाल्यानंतर प्रतिवादी / ऋणको यांनी कोणतेही अपील दाखल केलेले दिसून येत नाही. प्रस्तुत अर्जदार यांच्या कथनानुसार त्यांन गट क्र.११५ मधील जमीन खरेदी केलेली आहे, परंतु कोणत्याही खरेदीखताची प्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांनीच असे कथन केलेले आहे की, मुळ दाव्याचा निकाल लागल्यानंतर त्यांनी गट क्र.११५ मधील ०० हे ४० आर ही जमीन खरेदी केलेली आहे. यावरुन हे स्पष्ट होत आहे की, प्रस्तुत अर्जदार यांना मुळ दाव्यातील हुकुमनाम्याची पुर्णपणे माहिती होती. ऋणको नामे महादेव आंधळे आणि प्रस्तुत अर्जदार नामे अशोक महादेव आंधळे यांच्यामध्ये वडील आणि मुलाचे नातेसंबंध आहेत. मुळ दाव्यातील हुकुमनाम्याविरुद्ध कोणतेही अपील दाखल न करता त्या जमीनीचे हस्तांतर ऋणको महादेव आंधळे यांनी त्यांचा मुलगा / अर्जदार अशोक आंधळे यांच्या नावे केलेले दिसून येत आहे. अर्जदार यांच्या कथनावरुन हे स्पष्ट दिसून येत आहे की, मुळ दावा प्रलंबित असताना संबंधित मिळकतीची मालकी ऋणको यांच्याकडेच होती. अर्जदार यांना कोणतीही हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या न्यायालयामध्ये दाद मागणे आवश्यक आहे, परंतु त्यांनी प्रस्तुत दरखास्तीमध्येच त्यांना सामील करुन घेणेसाठी अर्ज सादर केलेला आहे. कोणत्याही हुकुमनाम्याची अंमलबजावणी करणा–या न्यायालयाला हुकुमनाम्याच्या पाठीमागे जाता येणार नाही असे न्याय तत्व असल्यामुळे अर्जदार यांना

प्रस्तुत दरखास्तीमध्ये सामील करणे आवश्यक दिसून येत नाही. सबब, पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

प्रस्तुत अर्ज **(नि.क्र.१५)** नामंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2026.01.16 10:59:39 +0530

**दिनांक : १५/०१/२०२६.**

**( विष्णु द. गिते )**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वडवणी,**
**जि. बीड.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. विष्णु द. गिते,**<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर,<br>वडवणी. |
| लघुलेखकाचे नाव | :- | राजेश आर. कुलकर्णी. |
| घोषित दिनांक | :- | १५/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १५/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १५/०१/२०२६ |